**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ८**

**सभावृत्तांत**

दिनांक - १६/११/२००९ दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २००९ ची मासीक सभा शुक्रवार दि.१३/११/२००९ रोजी आयोजित करणेत आली होती. परंतु दि.१३/११/२००९ रोजी मा.आयुक्त साो. यांनी सार्वजनीक सुट्टी जाहीर केलेने सदर सभा सोमवार दिनांक १६/११/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे घेण्यात आली. सभेस खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. साने दत्तात्रय बाबुराव -- अध्यक्ष
२) मा. भालेकर शांताराम कोंडिबा
३) मा. जाधव विजया अशोक
४) मा. चांदगुडे महेश गंगाराम
५) मा. बाबर प्रकाश धरमसिंगच
६) मा. उबाळे सुलभा रामभाऊ
७) मा. खाडे तानाजी विठ्ठल
८) मा. उबाळे वैशाली संजय
९) मा. पवळे सुमनताई मधुकर
१०) मा. कुमार आर एस.
११) मा. कुटे गोपाळ नाना

याशिवाय मा. श्री पी.एच. झुरे, प्रभाग अधिकारी, मा. श्री बी.टी.बनकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य अ प्रभाग), मा.श्री.एम.डी. निकम, कार्यकारी अभियंता (स्थापत्य मुख्यालय), मा.श्री जी. आर. चिंचवडे, कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री.ए.जी. भोसले, प्रशासन अधिकारी, मा.श्री एस.टी. आव्हाळे, लेखाधिकारी, मा.श्री. जवळकर , मा. श्री पी. बी. नाईकरे,. सहाय्यक आरोग्य अधिकारी, मा.श्री.नितीन देशमुख, उपअभियंता (विद्युत) मा.श्री. सुधाकर कुदळे, मा.श्री सुपेकर, मा.श्री.फुटाणे, मा.श्री. दिलीप कुदळे, मा.श्री दांगट, उपअभियंता (स्थापत्य), मा.श्रीरामगुडे, श्री. विशाल कांबळे उपअभियंता (पाणीपुरवठा) तसेच मा.श्री.परदेशी, उपअभियंता (जल निःसारण) इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य व अधिकारी यांचे आभार मानून व स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने खालील प्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. १ अ प्रभागात अतिक्रमण कारवाई करणेसाठी ट्रक, क्रेन, जीप भाड्याने घेणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ९,९८,५००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

विषय क्र. २ वॉर्ड क्र.३९ चिंचवड स्टेशनमधील ॲटो क्लस्टर समोरील रस्त्यावरील दिव्यांसाठी रोहित्रसंच बसविणेकामी येणाऱ्या रक्कम रु.९,९९,७००/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

विषय क्र. ३ मा. सुलभा उबाळे यांचा प्रस्ताव
सिमा भिंत बांधणे व स्वागत कमान उभारणेबाबत .

विषय क्र. ४ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
बेंच (बाकडी) बसविणेबाबत .

विषय क्र. ५ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
लॉन बदलणेबाबत .

विषय क्र. ६ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
सोसायटीचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ७ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
नाम निदैशित फलक लावणे बाबत.

विषय क्र. ८ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
पाण्याची पाईप लाईन बदलणे बाबत.

विषय क्र. ९ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
दिशा दर्शक फलक लावणे बाबत.

विषय क्र. १० मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
नामकरण करणेबाबत

विषय क्र. ११ मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव
मोकळया जागेत उद्यान विकसीत करणेबाबत.

विषय क्र. १२ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
मौजे तळवडे येथील गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखड्यातून वगळणेबाबत.

विषय क्र. १३ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
मौजे तळवडे येथील गट नं. १७३ मधील प्राथमिक शाळा आरक्षण क्र. पीएस१/१४ नियोजित विकास आराखड्यातून वगळणेबाबत.

विषय क्र. १४ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
मौजे तळवडे येथील गट नं. ११४, २३३ मधील माध्यमिक शाळा व उद्यान आरक्षण क्र. १/२३ व १/१३ नियोजित विकास आराखड्यातून वगळणेबाबत.

विषय क्र. १५ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
मौजे तळवडे येथील गट नं. २२१ मधील व्यापार संकुल, वाहनतळ व सांस्कृतिक भवन आरक्षण क्र.आरएम १/२, सीसीएल १/३, पी१/४ एससीएम १/५ वगळणेबाबत.

विषय क्र. १६ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
मौजे तळवडे येथील गट नं. १९९ मधील प्राथमिक शाळेचे आरक्षण क्र. १/२४ नियोजित विकास आराखड्यातून वगळणेबाबत.

विषय क्र. १७ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील जमीन नियोजित आरक्षण स.न. गट क्र. ११६ योजनेतून वगळणेबाबत.

विषय क्र. १८ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील जमीन नियोजित आरक्षण स.न. गट क्र. ११५ योजनेतून वगळणेबाबत.

विषय क्र. १९ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील नवीन नियोजित आरक्षण स.न. गट क्र. ११७ योजनेतून वगळणेबाबत.

विषय क्र. २० मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील जमीन नियोजित आरक्षण गट क्र. ९० व १०४ योजनेतून वगळणेबाबत.

विषय क्र. २१ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील गट नं. २२३ मधील आरक्षण नं. पी.एस. १/१ आधीचा उद्देश प्राथमिक शाळा, बदललेला उद्देश मोकळे मैदान वगळणेबाबत.

विषय क्र. २२ मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव
गाव मौजे तळवडे येथील गट नं. ९३, ९६ चा काही भाग, १००, १०१ संपूर्ण व १०४ चा काही भाग आरक्षण नं. EWS १/२६ आधीचा उद्देश अर्थिक दुर्बल घटकांसाठी गृह संस्था निर्माण, बदललेला उद्देश निवासी कारणास्तव वगळणेबाबत.

विषय क्र. २३ मा. वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव
वॉर्ड क्र.४७ मधील विकास कामांबाबत.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ११८ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : स्थापत्य विभाग |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. विजया जाधव |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. स्था/अ प्रभाग /११८६/ २००९ दिनांक २७/१०/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

वॉर्ड क्र. ६ बग वस्ती मधील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी येणाऱ्या र.रु. ९,९८,०००/- (अक्षरी र.रु. नऊलाख आठ्ठयाण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ११९ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : स्थापत्य विभाग |
| सुचक | : मा. प्रकाश बाबर | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. स्था/अ प्रभाग /११८७/ २००९ दिनांक २७/१०/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

वॉर्ड क्र. ५ म्हेत्रेवस्ती येथील उच्चदाब वाहीनी खालील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी येणाऱ्या र.रु. ९,९५,०००/- (अक्षरी र.रु. नऊ लाख पंच्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२० | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : स्थापत्य विभाग |
| सुचक | : मा. सुलभा उबाळे | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. स्था/अ प्रभाग /१२४०/ २००९ दिनांक ११/११/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभागात अतिक्रमण कारवाई करणेसाठी ट्रक, क्रेन, जीप भाड्याने घेणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ९,९८,५००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२१ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : विद्युत विभाग |
| सुचक | : मा. कुमार आर.एस. | अनुमोदक | : मा. गोपाळ कुटे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. /अ प /वि आ /२५१/ २००९ दिनांक ११/११/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

वॉर्ड क्र.३९ चिंचवड स्टेशनमधील ॲटो क्लस्टर समोरील रस्त्यावरील दिव्यांसाठी रोहित्रसंच बसविणेकामी येणाऱ्या रक्कम रु.९,९९,७००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख नव्याण्णव हजार सातशे फक्त) चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२२ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुलभा उबाळे | अनुमोदक | : मा. विजया जाधव |

संदर्भ : मा. सुलभा उबाळे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ४४ यमुनानगर येथील कै. रमाबाई ठाकरे वाचनालयासमोरील मोकळ्या जागेवरील सिमा भिंत ठिकठिकाणी पडलेली असलेने आर.सी.सी पध्दतीने बांधणेस तसेच ज्युबली ग्राउंड या ठिकाणी स्वागत कमान उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२३ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र. ४८ निगडी - यमुनानगर येथे ठिकठिकाणी बेंचेस (बाकडे) बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२४ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

यमुनानगर येथील सद्‌गुरु दत्त उद्यान येथील लॉन बदलनेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२५ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

साईनाथनगर निगडी येथे नव्याने निर्माण झालेल्या सोसायटीस **रुनाल फ्लोरेन्स** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२६ | विषय क्रमांक | : ९ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

सेक्टर नं.२१, यमुनानगर येथील योजना क्र.९ मधील २२ चाळींना नामनिर्देशित फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२७ | विषय क्रमांक | : १० |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.४८ निगडी-यमुनानगर मधील जुनी झालेली पाण्याची पाईप लाईन बदलणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२८ | विषय क्रमांक | : ११ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

यमुनानगर येथील योजना क्र. ११ समोरील रस्त्यावर **आणाभाउ साठे सांस्कृतीक भवनाकडे** असा दिशा दर्शक फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १२९ | विषय क्रमांक | : १२ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. सुमनताई पवळे | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

यमुनानगर येथील योजना क्र. ९ येथील श्री दत्त मंदिर प्रवेशद्वाराला **दिवंगत महापौर मधुकर पवळे प्रवेशद्वार** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३० | विषय क्रमांक | : १३ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. महेश चांदगुडें |

संदर्भ : मा. सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव

यमुनानगर येथील योजना क्र. ९ येथील श्री दत्त मंदिराजवळील मोकळ्या जागेत उद्यान विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : १३१ विषय क्रमांक : १४
दिनांक : १६/११/२००९ विभाग :
सुचक : मा. शांताराम भालेकर अनुमोदक : मा. तानाजी खाडे

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. ७७ ते गट नं.१४४ मधील १८ मिटर रुदीचा अंतर्गत रस्ता विकास आराखड्यामध्ये दर्शविणेत आलेला असून मूळ मालकांनी त्यांचे हिस्से वाटपानुसार पूर्व पश्चिम विविध अंतर्गत रस्ते टाकले आहेत. सदरचा रस्ता अंतर्गत स्वरुपाचा असून जवळच त्रिवेणीनगर-तळवडे मुख्य रस्ता व शिवेचा रस्ता असे २४.०० मीटर चे दोन प्रमुख रस्ते आहेत व हा अंतर्गत रस्ता गट नं. ७७ ते गट नं.१४४ पर्यंतच दाखविलेला असल्याने सदर रस्त्याची गरज वाटत नाही. तसेच या भागातील रस्ता बाधीत शेतकरी हे अल्पभूधारक असलेने गट नं. ७७ ते गट नं. १४४ पर्यंतचा नियोजीत १८ मीटर रस्ता विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : १३२ विषय क्रमांक : १५
दिनांक : १६/११/२००९ विभाग :
सुचक : मा. शांताराम भालेकर अनुमोदक : मा. तानाजी खाडे

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. १७३ मध्ये महापालिकेच्या नियोजित विकास आराखड्यानुसार प्राथमिक शाळा आरक्षण क्र. पीएस१/१४ टाकणेत आलेले आहे. तळवडे भागात शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी अशा एकुण सहा शिक्षण संस्था असल्याने या आरक्षणाची आवश्यकता वाटत नाही तसेच गट क्र.१७३ हा नियाजित २४ मीटर रस्त्याने बाधीत असलेने सदरचे आरक्षण विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : १३३ विषय क्रमांक : १६
दिनांक : १६/११/२००९ विभाग :
सुचक : मा. शांताराम भालेकर अनुमोदक : मा. तानाजी खाडे

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. ११४ व २३३ मध्ये महापालिकेच्या नियोजित विकास आराखड्यानुसार माध्यमिक शाळा व उद्यान साठी आरक्षण क्र. १/२३ व १/१३ आहे. गट नं.२३३ चे क्षेत्र ८३ आर असून त्यात ७ हिस्सेदार आहेत. त्यापैकी अदाजे ४५ आर क्षेत्र हे उद्यानासाठी व ५ आर क्षेत्र हे १८.०० मीटर रस्त्याने बाधीत असे एकुण विकास आराखडयामध्ये ५० आर म्हणजेच जवळजवळ ६० % बाधीत होत आहे. सदर शेतकऱ्यांचा हा गट क्र.११४ हा (आरक्षण क्र.१/२३) आहे. सदरचा गट नं. ११४ वर माध्यमिक शाळा व १२.०० मीटर रस्त्याने १०० % बाधीत होत आहे. सदर शेतकऱ्यांचाच गट नं.१९२ हा दारुगोळा भांडाराच्या सिमा भिंतीला लागून असलेने तेथे कोणत्याही प्रकारचा विकास करु दिला जात नाही आणि गट क्र. १९२ हा नियाजित १८.०० मीटर रस्त्याने बाधीत असलेने उक्त आरक्षण विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३४ | विषय क्रमांक | : १७ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा.  शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा.  तानाजी खाडे |

संदर्भ   : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. २२१ मध्ये महापालिकेच्या नियोजीत विकास आराखडयानुसार व्यापार संकुल, वाहनतळ व सांस्कृतिक भवनासाठी महापालिकेच्या नियोजित विकास आराखड्यानुसार आरक्षण (क्र.आरएम १/२, सीसीएल १/३, पी१/४ एससीएम १/५) टाकणेत आलेले आहे. सदरचे आरक्षण हे व्यावसायीक व व्यापारीक दृष्टया गरजेचे वाटत नाही तसेच गट क्र. २२१ मध्ये नियोजीत १२ मी. रस्ता आहे.  त्यामध्ये बरेचसे क्षेत्र बाधीत होत आहे.  तरी गट नं. २२१ मध्ये व्यापार संकुल, वाहनतळ व सांस्कृतिक भवनासाठी महापालिकेच्या नियोजित विकास आराखड्यानुसार टाकणेत आलेले आरक्षण क्र.आरएम १/२, सीसीएल १/३, पी१/४ एससीएम १/५ हे वगळणेस मान्यता देणेत येत आहे.  सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३५ | विषय क्रमांक | : १८ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा.  शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा.  तानाजी खाडे |

संदर्भ   : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट नं. १९९ मध्ये प्राथमिक शाळेसाठी महापालिकेच्या नियोजित विकास आराखड्यानुसार आरक्षण क्र. १/२४ आहे. गट नं.१९९ हा देहूरोड दारुगोळा भांडाराच्या सिमा भिंतीला लागून असलेने तेथे २००० यार्ड क्षेत्र (रेड झोन) आसून ते कमी होणे अशक्य आहे. तसेच यापैकी काही भाग हा नियाजित १८.०० मीटर व १२.०० मीटर रस्त्याने बाधीत होत असलेने गट क्र.१९९ मधील प्राथमिक शाळेचे आरक्षण क्र १/२४ विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे.  सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३६ | विषय क्रमांक | : १९ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा.  शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा.  तानाजी खाडे |

संदर्भ   : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. १/२२ ही जागा उद्यानाकरिता आरक्षीत केलेली आहे. सदर आरक्षण हे गट क्र ११६ मध्ये दर्शविणेत आले आहे. तरी गट क्र. ११६ मधील सर्व जागा आरक्षण क्र.१/२२ मधुन वगळण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३७ | विषय क्रमांक | : २० |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. ११५ मधील महाविद्यालया करिता आरक्षीत केलेली (आरक्षण क्र.१/२३) जागा विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३८ | विषय क्रमांक | : २१ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. ११७ मधील उद्यानासाठी आरक्षीत केलेली (आरक्षण क्र.१/२२ ) जागा विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३९ | विषय क्रमांक | : २२ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. ९० व १०४ मधील जागा प्रथमिक शाळा E.W.S. विकास योजनेसाठी आरक्षीत केलेली आहे. गट क्र.९० व १०४ मधील (आरक्षण क्र.१/२८ व १/२६ ) जागा विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४० | विषय क्रमांक | : २३ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. २२३ मधील आरक्षण नं. (PS १/१) आधिचा उद्देश प्राथमिक शाळा बदललेला उद्देश मोकळे मैदान आरक्षण क्र. (PS १/१) टाकणेत आलेले आहे परंतु सदर जागेवर लोक सन १९८२ पासून घरे बांधून राहत असलेने आरक्षण वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४१ | विषय क्रमांक | : २४ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. शांताराम भालेकर | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे तळवडे येथील गट क्र. . ९३, ९६ चा काही भाग, १००, १०१ संपूर्ण तसेच १०४ चा काही भाग आरक्षण नं. EWS १/२६ हा आधीचा उद्देश अर्थिक दुर्बल घटकांसाठी गृह संस्था निर्माण याकामी आरक्षीत आहे. परंतु तेथे निवासी घरे बांधावयाची असलेने सदरचे आरक्षण विकास आराखड्यातून वगळणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यता मिळणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४२ | विषय क्रमांक | : २५ |
| दिनांक | : १६/११/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. वैशाली उबाळे | अनुमोदक | : मा. तानाजी खाडे |

संदर्भ : मा. वैशाली उबाळे यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्र.४७ मध्ये स्मशान भूमीजवळ बाहेरील भागात वाचनालय बांधणे तसेच स्मशानभूमी अंतर्गत भागात सुचना फलक व सुविचारांचे मार्बल फलक लावणे व स्मशाना बाहेर व आतील भागात बसण्यासाठी लोखंडी बाकडे बसविणे इ. कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-xxx
(दत्तात्रय बाबुराव साने)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
क्र. अप्र/प्रशा/२/कावि/ २९७ /०९
दिनांक :- ७ / १२ /२००९

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४

प्रत :- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना